**वादीचा पुढील सरतपास शपथेवर सुरू–**

०१. माझे सरतपासातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला असुन खरा व बरोबर आहे. त्यावर मी वाचुन सही केली आहे. माझी कंपनीची पार्टनरशिप डीड त्याची पडताळणी केलेली छायांकित प्रत दाखल केलेली असुन त्याची मुळ प्रत मी सोबत आणलेली आहे. त्याची मुळ प्रत खरी व बरोबर असुन छायांकित प्रतीतील मजकुर मुळ प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर सर्व भागीदारांच्या सहया असुन त्या मी ओळखतो. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. कंपनीने माझे हक्कात करुन दिलेले आम मुखत्यारपत्र याची छायांकित पडताळणी केलेली प्रत मी दाखल केली असुन ती मुळ प्रमाणे खरी व बरोबर आहे. त्यावर सर्व भागीदारांपैकी रामचंद्र बरमु पाटील यांची आणि माझी सही आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते.

०२. प्रतिवादी संस्थेने वर्तमानपत्रात दिलेल्या टेंडर नोटीसची छायांकित प्रत दाखल केली असुन ती प्रतिवादी यांच्या वकिलांना मान्य असल्याने **नि.क्र.२५** देण्यात येते. प्रतिवादी संस्थेने वादी संस्थेला दिलेले इरादा पत्र दिनांक ०६.१०.२०१० रोजीचे दाखल केले असुन ते मला दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर प्रतिवादी संस्थेचे मुख्याधिकारी यांची सही आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येते.

पुढील सरतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृती

ADITI RATANKUMAR NAGORI
Digitally signed by ADITI RATANKUMAR NAGORI
Date: 2024.11.22 11:08:34 +0530

दिनांक – २१.११.२०२४. (अदिती आर. नागोरी)

राहाता. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, राहाता.